# पाणी पुरवठा विभाग

## 1. सीआर/ 70 /सातारा/2015 .

फिर्यादी हे व्यवसायाने शेतकरी असून  त्यांची आजीचे नावे शेत जमीन असून त्या क्षेत्रामध्ये नवीन विहीरीचे बांधकाम करण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत वैयक्तीक विहीर खोदाई व बांधकाम करणेचा प्रस्ताव पंचायत समिती कोरेगांव यांचेकडून मंजूर करण्यात आला होता. सदर योजने अंतर्गत वैयक्तीक नवीन विहीर खुदाई व बांधकामासाठी शासनाकडून रु.१,९०,०००/- अनुदान मिळते.

नमूद योजने अंतर्गत वैयक्तीक नवीन वहिरीची खुदाई व बांधकाम २०१४ मध्ये पुर्ण झाले असून रु.१,४०,०००/- अनुदान पं.समिती कोरेगांव व ग्रामपंचायत तडवळे सं.कोरेगांव यांचे मार्फतीने आदा केले आहे. उर्वरीत रु.६१,०००/- अनुदान येणे बाकी होते.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक लाभाची सिंचन विहीरीच्या स्थापत्यकामाची प्रत्यक्षात पाहणी करुन शाखा अभियंता यांनी केलेली मोजमापे तपासून त्यासंबंधी एम.बी.रजिस्टरवर स्वाक्षरी करणेसाठीची जबाबदारी उप अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा जि.प.उप विभाग कोरेगांव यांची आहे.

आलोसे श्रीकांत रामचंद्र चौगुले, उप अभियंता, वर्ग-१  ग्रामिण पाणी पुरवठा जि.प.उपविभाग कोरेगांव यांनी उपअभियंता म्हणून ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग कोरेगांव येथे काम करीत असताना फिर्यादी यांचे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तीक विहीर बांधकामाची पाहणी करुन एम.बी रजिष्टरवर सही करुन देणेसाठी रु.३,०००/- लाच मागणी करून तडजोडीअंती रु.२,०००/- लाच रकमेची दि.२०/०१/२०१५ रोजी स्विकारलेनंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले.

त्याबाबत कोरेगांव पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.६/२०१५, ला.प्र.का.कलम ७,१३,(१)(ड)सह १३(२) प्रमाणे दाखल करुन लोकसेवक चौगुले यांना अटक करण्यात आली आहे.

## २. सिआर/२०५/गोंदिया/१५

फिर्यादी यांचा खाजगी व्यवसाय आहे. तक्रारदार यांचे वडीलांचे नावावर मौजा पलखेडा येथे असलेल्या भुमापण क्र. २०३ आराजी १.४९ या शेत जमीनीवर राखेपासुन विटा तयार करण्याचा उद्योग सुरू करण्याकरीता कृषक जमीनीचा औद्योगीक प्रायोजनार्थ अकृषक परवानगीची आवश्यकता असते. त्याकरीता तक्रारदार यांनी संपुर्ण प्रक्रिया पुर्ण करून आवश्यक दस्तऐवजासह तहसिल कार्यालय, गोरेगाव जि. गोंदीया येथे अर्ज सादर केला. त्या अनुषंगाने महाराष्ट्र जिवन प्राधीकरण कार्यालयाकडुन ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता आरोपी लोकसेवक सुनिल वासुदेवराव दर्भे, वय ५२ वर्षे, पद-शाखा अभियंता श्रेणी-२, महाराष्ट्र जिवन प्राधीकरण, नागरी व ग्रामीण योजना उप विभाग क्र.३, जि. गोंदीया यांनी रु.३,०००/- लाच रक्कमेची मागणी केली.

दि. २६/०२/२०१५ रोजी आरोपी लोकसेवक सुनिल वासुदेवराव दर्भे, पद-शाखा अभियंता यांना फिर्यादीकडून रु.३,०००/- लाच रक्कम स्विकारल्यावरून रंगेहाथ पकडण्यात आले.

सदरबाबत पो.स्टे. रामनगर, जि. गोंदिया अप.क्र. ३०११/२०१५ कलम ७,१३ (१)(ड), १३ (२) ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवून आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.

## ३. सीआर/४२/राय/२०१५

लोकसेवक प्रल्हाद गिरीधरराव बिराजदार,उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग पेण, (अतिरिक्त कार्यभार, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, रा.जि.प. अलिबाग, जि.रायगड) (वर्ग-२) यांनी शासकीय नोकर/लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन त्यांनी स्वत:चा आर्थिक फायदा करुन घेणेकरीता तक्रारदार यांच्या कामांच्या पाणी पुरवठयासंबंधीच्या कामांच्या फाईलमध्ये अभिप्राय देण्याकरीता व कामे पूर्ण झाल्यानंतर त्यांची बिले मंजूर करण्याकरीता एकूण रकमेच्या २ टक्के लाचेच्या रकमेची मागणी करून तडजोडी अंती एकुण रक्कमेच्या दिड टक्के रक्कमेची म्हणजे रु.६०,०००/- लाचेची मागणी केली व दिनांक १४/०१/२०१५ रोजी आयोजित सापळयाचे वेळी लाचेच्या रकमेपैकी टोकन म्हणुन रु.२०,०००/- लाचेची मागणी करून स्विकारून स्वत:चा आर्थिक फायदा करून घेतला आहे.

आरोपी लोकसेवक बिराजदार यांच्याविरुध्द अलिबाग पोलीस स्टेशन कॉ.गुन्हा रजि. नं. ।। ३/२०१५ लाचलुचपत प्रतिबंध कायदा सन-१९८८ चे कलम ७, १३(१)(अ)(ड) सह १३(२) प्रमाणे गुन्हा दिनांक १४/०१/२०१५ रोजी २३-२० वा. दाखल करण्यात आला आहे.

आरोपी लोकसेवक बिराजदार यांचे साईलिला सोसायटी, बी विंग, पहिला माळा, रूम नं.१०२, श्रीबाग, ता.अलिबग, जि.रायगड येथील राहते घराच्या घरझडतीमध्ये (१) रु.१२,४०,०००/- रोख रक्कम, (२) वेगवेगळया बॅंक खात्यामध्ये एकुण रु.२८,२२,९५६/- शिल्लक व रु.२,२४,६९७/- रक्कमेची एफ.डी., (३) रु.३,१२,५००/- किंमतीचे घरसामान अशी एकूण रु.४६,००,१५३/- किंमतीची मालमत्ता तसेच ४५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, एक मोटार सायकल अशी मालमत्ता प्रथमदर्शनी निष्पन्न झाली आहे.